ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | क्षत्रिय<br>मराठ्यांची रूढी आणि सुधारणा |
| लेखक | : | देशमुख निळकंठराव भाऊसाहेब खळतकार |
| प्रकाशक | : | सिताराम छापखाना, नरखेड |
| प्रकाशन वर्ष | : | १९०७ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२३

॥ श्री जगदंबा प्रसन्न. ॥

संक्षिप्त

# मराठ्यांची रुढि आणि सुधारणा

किमत ८६ आणे.

( The Sitaram Press Narkher.)

# अनुक्रमणिका.


| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण | १ ले. मराठे क्षत्रीय आहेत. ... | पान | १ |
| ,, | २ रे. विद्या ... ... ... | ,, | ३ |
| ,, | ३ रे. मराठ्यांचे वर्ग ... ... | ,, | ८ |
| ,, | ४ थे. मराठ्यांची कुळदैवते ... | ,, | १० |
| ,, | ५ वे. लग्न समारंभ ... ... ... | ,, | १२ |
| ,, | ६ वे. मराठ्यांतील पडदा ... ... | ,, | २३ |
| ,, | ७ वे. किरकोळ चाली ... ... | ,, | २७ |
| ,, | ८ वे. दासीपुत्रास दाय भाग नाहीं | ,, | ३३ |
| ,, | ९ वे. मराठे व कुणबी ह्यांच्या रुढितील अंतर. .... .... | पान | ३४ |
| ,, | १० वे. सारांश व पुस्तककर्त्याची विनंती | ,, | ३७ |

॥ श्रीशंकर प्रसन्न ॥

॥ स्वधर्मो निधनं श्रेयः । परधर्मो भयावहः ॥

# क्षत्रिय मराठे जातीची रूढी व तिची सुधारणा

हें पुस्तक


## देशमुख निळकंठराव भाऊसाहेब खळतकार.

ऑनररी माजिस्ट्रेट व डिस्ट्रीक्ट कौन्सील मेंबर पोष्ट-दिग्रस.

तह. काटोल जि. नागपूर मध्यप्रदेश.


ह्यांनीं लिहून तयार केलें


इ० सन १९०७

आवृत्ती पहिली.

मार्गेश्वर शुद्ध १९ गुरूवार शके १८२९.

प्रती ५००

किंमत ६ आणे.

नरखेड येथें सिताराम मोहादिकर यांचें सिताराम छापखान्यांत
छापून दिग्रस येथें प्रसिद्ध केलें.

( हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टा प्रमाणें
रजिष्टर करून सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकानें आपणाकडेस
ठेविले आहेत. )

# अर्पण पत्रिका.

हें पुस्तक— कैलासवासी तीर्थरूप श्रीमंत त्रिंब-
कराव नानासाहेब खळतकार देशमुख व
श्रीगुरु परमहंस स्वामी आनंदानंद म-
हाराज ह्यांचे स्मरणार्थ अत्यंत पूज्य
बुद्धीनें लिहून नम्रता पूर्वक त्यां-
चे चरणीं अर्पण केलें असे.

## आणि

विद्यमान माझ्या सद्गुणी व कृपाळु माता ती-
र्थरूप श्री गंगा मातोश्री श्री अंजीरा
बाईसाहेब व भागीरथी बाईसा-
हेब खळतकार ह्यांचे चरणीं
माझें नमन असो.

# प्रस्तावना.

क्षत्रिय मराठे जातीचे रूढी संबंधानें दोनशद्ध लिहावें असें पुष्कळ दिवसापासून मनांत घोळत होते परंतु हें काम करण्यास आपण योग्य आहो असे वाटत नसल्यावरून व आपण विद्वान व रूढलेलें जुने माहितगार नाहीं. ह्या समजूतीनें आपण कदाचित् कांहीं चुकून लिहीलें तर त्याजबद्दल ज्ञातीबांधवाचा व मित्रमंडळीचा लिहीलेले मजकूराबद्दल रोष होईल व दोषास्पद होऊं. ही कल्पना घेऊन बसलो तर आपले विचार काय आहेत. हे आपले जातीबांधवास कधींच कळावयाचे नाहींत. व मनुष्यजन्म क्षणीक असल्यामुळें स्वप्नांतील स्थितीप्रमाणें जागे झाल्यावर ज्याप्रमाणें कांहींच नाहीं त्यासारखें आपलें विचार गुप्त राहतील. असें समजून आज ईशकृपेनें आपलें विचार अजाणपणानें व वेडगळ समजूतीनें क्षत्रिय मऱ्हाठ्यांची हल्लीं प्रचारांत असलेली रूढी व तिची सुधारणा ह्या विषया संबंधानें लिहीत आहे.

मी पुष्कळ शिकलेला विद्वान मनुष्य नसून वडीलांनीं दिलेलें मराठी विद्येचे थोडेसें शिक्षण, ह्याचा कांहीं-

तरी उपयोग व्हावा ह्या हेतूनें मी हें पुस्तक लिहीत आहे.

हें पुस्तक लिहीण्याचा हाच हेतु आहे कीं, पूर्वापार चालत आलेल्या कांहीं रुढीची हल्लींच्या काळास अनुसरून कांहीं सुधारणा व्हावी, व मागासलेल्या मराठे मंडळीनें आपलें कर्तव्य काय आहे. ह्याजकडेस पूर्णपणें लक्ष पुरवावें. पूर्वींचे आपण कोण? हल्लीं कोणत्या स्थितींत आहो? व आपली स्थिती कशी सुधारेल? हें प्रत्येक मराठा क्षत्रियानें मनावर घेऊन सुधारणेचे उपायांची अमलबजावणी करण्यास सुरूवात केली पाहिजे. .

मी हा जो लेख लिहीत आहे तो अशुद्ध, चुकलेला, रुढींचे व जातींचे मानानें विरुद्ध, व वेडगळ समजुतीचा आहे असें समजावें. परंतु जें घेण्यासारखें आहे, त्याचा तरी उपयोग माझे ज्ञातीबांधव करून मागसलेले मराठे जातीची सुधारणा करतील, व मी लिहीलेल्या मजकुराबद्दल क्षमा करतील अशी आशा आहे. हा लेख सर्वच रुढींची सुधारणा ह्याजवर आहे, असें समजूं नये. कांहीं तुरळक रुढीवर लिहिला आहे.

जात्याभिमान व धर्माभिमान समजून जन्मास येऊन

कांहींतरी सार्थक करावें, व ज्ञातीबांधवांना पुस्तक रूपानें आपली ओळख होऊन, त्यांनीं आपल्या धर्माची सुधारणा करावी. एतदर्थ मी हा ‘ श्री गणेशायनमः । ’ अल्पमतीनें लिहीत आहे; माझे ज्ञातीबांधव सुदामाच्या पोह्याप्रमाणें मीं लिहिलेल्या दोनशद्बाचा योग्य उपयोग करतील अशी आशा आहे.

दयाळु इंग्रज सरकारच्या राज्यांत, मध्य प्रांतांतील नागपूर जिल्ह्यांत दिग्रस नांवाच्या एका लहान गांवांत राहणारा असून, माझे गोत्र—गार्ग्य. कुळाचें आडनांव ( हल्लीं ) खळतकार आहे.

आपला

**ग्रंथकर्ता.**

क्षत्रिय मराठ्यांची

# रूढी आणि सुधारणा

प्रकरण १ ले.

## मराठे हे क्षत्रिय आहेत.

मराठे हे क्षात्रिय आहेत, ह्याजबद्दल कोणीं शंका घेऊं नये. शंका असेल त्यांनीं संस्थान करविर ( कोल्हा-पूर ) येथील श्री सिद्धांत विजय ग्रंथ व शान्नव कुळीं वंशावळी पहावी. म्हणजे आपण कोण आहो; त्याची खरी कल्पना आपणांस ( मराठी यांस ) होईल.

शान्नवकुळी, व वंशावळी, ह्या पुस्तकांची प्रथमावृति कैं० रामजी धायाजी यांनीं छापून प्रसिद्ध केली. व दुसरी आवृति बाळकृष्ण लक्ष्मण पाठक बुकसेलर मुंबई ह्यांनीं छापून प्रसिद्ध केली, पण ती बरोबर नसावी असें मला वाटते. कारण आडनांवा प्रमाणें गोत्रांचा मेळ श्री सिद्धांत बिजय ग्रंथाला अनुसरून नाही. कारितां पुनः सु-

धारून नविन शान्नवकुळी भरपूर माहितीची तयार केल्यास ठिक पडेल. तसेंच श्री सिद्धांत विजयांत नुसता अकरा कुळांचा खुलासा केला आहे. त्यालाच एक पुरवणी जोडून सर्वत्र मराठे क्षत्रिय मंडळींची शान्नव कुळींचीं आडनांवें व गोत्रें जोडल्यास प्रत्येक मराठ्याचे उपयोगाचा व सोईचा-हा श्री सिद्धांत विजय ग्रंथ होईल.

हीं अकरा कुळें निरनिराळ्या गोत्रांच्या कुळाचें व आडनांवाच्या आप्तवर्गाचें नातलग [सोयरे] आहेत, ह्मणून सर्व शान्नव कुळींतील मऱ्हाठे अकरा कुळा प्रमाणेंच क्षत्रीय आहेत, यामुळें [करीतां] सर्वत्र शान्नव कुळींस हा ग्रंथ लागू पडतो.

प्रत्येक मराठा क्षत्रिय असलेलें मनुष्यानें आपले क्षत्रीयपणाबद्दल पूर्णपणें विश्वास ठेऊन यथाशास्त्र क्षत्रीयधर्माप्रमाणें सिद्धांत विजयान्वये आचरण ठेवावें, व आपलें धर्माचे रक्षण करावें. मराठ्यांना वेदोक्त रितीनें कर्म करून घेण्याचा अधिकार आहे. हे सिद्धांत विजयावरून स्पष्ट-ठरतें, वेदोक्त कर्माचा मराठ्यांत झालेला लोप ह्यांचे पुनरुज्जीवन विद्यमान श्रीमन्महाराज श्रीशाहू छत्रपती सरकार

करविर ( संस्थान कोल्हापूर ) ह्यांनीं करविले व श्रीसिद्धांत विजय छापून प्रसिध्द केला, ह्याजबद्दल सर्वत्र मराठे मंडळ विद्यमान श्रीछत्रपती महाराजांचे अभिष्ठ चिंतन करीत आहेत. व ते धर्माभिमानी व जात्याभिमानी आहेत. व त्यांचे मनांतून क्षत्रीय धर्माची सुधारणा व्हावी, व मराठें मंडळ उर्जितदशेंत राहावें हें पूर्णपणें बिंबलें आहे इतर जातीपेक्षां सदर्हू कोल्हापूर व बडोदे, ग्वाल्हेर वगैरे संस्थानांत मराठ्यांस त्यांच्या गुणाप्रमाणें व योग्यतेप्रमाणें योग्य आश्रय मिळून अनाथाचे संगोपन होते. व हेंच अनुकरण इतर लहान मराठ्यांची संस्थानें करीतील. सदर्हू मराठेसंस्थानीकांचे जात्याभिमानाबद्दल व मराठ्यांचे सुधारणेबद्दल आम्हा सर्वत्रांवर महद् उपकार आहेत. व हें त्यांना मोठें भूषण आहे, व आम्हीहि विसरतां कामा नये.

## प्रकरण २ रें.

## विद्या.

मराठ्यांत विद्येची रुची पाहिजे तशी अझून ला-

गलेली नाहीं व ह्या सुधारणेचे दिवसांत मराठ्यांचे मुलांना विद्या नसणें हे मोठें दुर्दैव, तरी श्रीमन्महाराज संस्थान बडोदे, कोल्हापूर, ग्वाल्हेर वगैरे इतर मराठे संस्थानिक ह्यांच्या कृपेनें त्या सर्व ( मराठे ) संस्थांत विद्येचा प्रसार दिवसेंदिवस होत आहे ही विशेष समाधानाची व आनंदाची गोष्ट आहे तितका प्रसार इंग्रजसरकारचीं सरकारी कालेजे व शाळा असूनसुद्धां अझून इंग्रजी ( खालसा ) मुलखांत राहणाऱ्या मराठ्यांत दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. ह्याजवरून इतर जातींपेक्षां मराठे विद्येंत मागसलेले आहेत हे क्षत्रीय मराठ्यांस मोठें दुषण आहे, असे स्पष्ट ह्मणावें लागतें. ह्याचे कारण हेंच आहे कीं, आळस व मराठेपणाची ऐट पूर्वीचा असलेला सुख वस्तुपणा ह्यामुळें व वाडवडील अविद्वान असल्या कारणानीं विद्येची खरी योग्यता मराठ्यांना अझुन समजत नाहीं. आपणापेक्षां निचजातसुद्धां विद्येनेंपुढें सरसावली असून आपापली सुधारणा करीत आहेत. जे मराठे पूर्वीं राजे, जाहागीरदार, इनामदार, वतनदार, देशमुख, जमीनदार, पाटील, सरदार वगैरे मानकरी होते. त्यांचेच वंशज आज पांच सहा रुपये दरमहा क-

मार्विणाऱ्या शिपायाचे लायकीचे नाहींत. असा दुर्धर प्रसंग मराठ्यांवर आहे, कित्येक अन्नान् करीत उपवासी भटकत फिरतात. किंवा निचाची गुलामगिरी करीत फिरतात. पण त्यांना कारकुनची सुद्धां जागा मिळत नाहीं, मग मोठ्या योग्यतेची जागा कोठून मिळेल.

असा हा कठीण प्रसंग आपणावर येऊन अझून पर्यंत मराठ्यांचे मनांत सुधारणेची जागृती उत्पन्न होत नाहीं. ह्याजबद्दल फारच वाईट वाटतें. ह्याचे कारण अविद्या हें होय. अझून तरी एखाद्या मराठ्याचे घरीं थोडी शेती, पाटीलकी, वतनदारी, सत्ता किंवा थोडा व्यापार असला तर त्याला एखाद्या मित्रानें किंवा आप्त स्वकीयानें म्हटलें कीं. तुम्ही आपलें मुलांस विद्या शीकवा ? तो कांहीं मागील पुढील विचार मनांत न आणतां. एकदम असें उत्तर देईल कीं, माझें मुलांस काय कमी आहे! विद्या शिकून काय करावयाचे आहे. त्याच्या नशीबांत असेल तसें होईल. असें अझुन पर्यंत चालूच आहे. कदाचित् बापानें मुलांस शिकविण्या बद्दल जर मनांत घेतलें तर मुलाची आई एकदम म्हणेल कीं. मुलाची विधेकरीतां तांटा तुटकरावयाची

नाहीं. मेले लोक आपल्या पदरचे थोडेच त्याला घालतील. त्यांच्या मेल्याच्या पदरचे काय जाते. लिहिणे शिकऊन त्याला काय कारकून करावयाचा आहे. अशा तऱ्हेनें बायकोनें नवऱ्याची समजूत करून द्यावयाची, व मुलांचें जन्माचे मातेरे करावयाचे, कारण नवरेही बहुत करून अशिक्षीत असल्या मुळें स्त्रिबुद्धेच असतात. कारण दोघेही अशिक्षीत व वेडगळ ह्याज वरून वाचकाना कल्पना होईल कीं, मराठ्यांचे मुळांत विद्येचा प्रसार जो होत नाहीं त्याचे कारण हेंच आहे.

विशेष ह्या पेक्षां जात लिहीत नाहीं पण माझे हात जोडून सवत्र मराठे ज्ञाती ब धवास सांगणें हेंच आहे कीं, विद्येचा प्रसार स्त्री पुरूष वर्गात करून आलेली उतरती कळा उद्योगानें व विद्येनें दूर करून उर्जीत दशेंत या. अशी सविनय प्रार्थना करितो. ह्याजवर कोणी शंका घेईल कीं, पुरूषांत विद्येचा प्रसार करणे चागलें, परतु स्त्रीयांत करणें वाईट पण माझेमत स्त्रीयांसही शीक्षण व विद्या असणें हें चागलें कारण त्यांच्या मनांतील वेडगळ समजूती व चाली नाहीशा होऊन त्या आपल्या सद्गुणानें आपल्या मु-

ला बाळांचें संगोपन उत्तम प्रकारें करून संसाराचा गाडा यथास्थित रितीनें चालविण्यास विद्येचें योगानें समर्थ होती-ल. विद्येचे योगानें. स्त्रीयांचें अंगीं असलेले अविचार व दु-र्गूण नाहींसें होऊन सुविचार व सद्बुद्धी व विवेक उत्पन्न होतील, व त्या स्तुतीस पात्र होतील, कित्येक म्हणतील कीं, स्त्रीया विद्येचे येगानें अमर्याद दुराचरी व दुष्ट निपजतील परंतु असें म्हणणें मोठें चुकीचें आहे कारण, विद्येचे योगा-नें मनुष्याचें मन दयाळु, मर्यादशील, क्षमाशील व विवेकी होतें. दुष्ट पणाचा दोषारोप करणें व्यर्थ आहे.

अविद्वान शेकडा ऐंशी दुष्ट निघतील तर विद्वान क्वचितच शेकडा पांच किंवा दाहा सुद्धां दुष्ट कींवा दुर्व्य-सनी निपजणार नाहींत. तसें म्हटलेंतर कांहीं विद्वान पुरूष सुद्धां दुष्ट व दुर्व्यसनी निपजतात मग स्त्रीयाकरीतांच कां असें मूद्दाम ह्मणतां हें समजत नाहीं. करीतां स्त्रीयां सुशीक्षीत जर असल्यातर त्या आपल्या पुरूषास सुद्धां दुर्व्यसना पा-सून ताब्यावर आणतील पण इतकें खरें कीं. मराठ मोळ्या प्रमाणें त्या सासु व नणदाच्या फाजील दाबांत व मानीपणां-त राहणार नाहींत. जेविद्या शिकून दुष्ट निपजतात तो विद्येचा

गुण नसून अल्प विद्या महा गर्वी होऊन विद्येचा सदुपयोग करीत नसुन दुरूपयोग करीतात विद्येच्या योगानें स्त्रिया-दुर्वर्तन सोडून चांगल्या सदवर्तनी निपजतील हें खात्रीनें ह्मणू शकतों करितां मराठ्यांचा स्त्रिपुरूष वर्ग सुशिक्षीत निपजेल व पुढारी होईल अशी आशा आहे व विद्येची वृद्धी झाली ह्मणजे मग सुधारणाहोण्यास कांहींच वेळ लागणार नाहीं. मराठे हें क्षत्रीय, कुलीन, विद्वान आहेत असें ठरून ते देश बांधवाचे व देशाचे कल्याण होण्या करीतां आपला उपयोग करीतील व राजनिष्टेस पात्र होतील. अशी आश बाळगतो.

---

प्रकरण ३ रें.

## मराठ्यांचें वर्ग.

मराठ्यांचें दोन वर्ग आहेत १ अस्सल मराठे (खासे) आणि २ खर्ची किंवा लेकोळे. (विदूर. दासींचें किंवा भाणशींचे पोटचे) कमीदर्जाचे मरा-

त्यांना गोत्रें आहेत. व त्यांचीं आडनांवें निरनिराळीं आहेत. हीं निरनिराळीं आडनांवें गांवांवरून कतृत्वानें कांहीं कारणांनीं पडलेली असावींत, असें वाटतें. कांहीं आडनांवें बदलेलीहि असतील. मराठे हें शिवभक्त व देविभक्त आहेत. राम, कृष्ण, विष्णू, नारायण, ह्यांचीहि भक्ति करितात. व त्यांना यज्ञोपवित ( जानवें ) घालण्याचा अधिकार आहे.

मराठे हें क्षत्रीये आहेत हें खरें, परंतु मराठ्यांत हल्लीं मौंज करीत नाहींत. ह्याचें कारण दारिद्य, अविद्या, व धर्मभ्रष्टपणा ह्यामुळें सर्वत्र मराठे जातींचे रिवाजाची एकी नसल्यामुळें, प्रत्येकजण आपापल्या ऐटींत व गर्वांत असल्यानें, ही चाल बंद पडली आहे. तरी राजे,संस्थानिक, किंवा जे श्रीमंत आहेत. त्यांचे येथें हल्लींहि मौंज सुरू आहे. मग इतर मराठ्यांनींहि मौंजी करण्यास कांहीं हरकत नाहीं. क्षत्रीयधर्मा प्रमाणें ही रीत सुधारणे प्रत्येकाचें कर्तव्य आहे. जरी मौंजीबंधन मराठे करीत नाहींत, तरी त्यांचे क्षत्रीयपणास ( अस्सलपणास ) बाध येतो असें नाहीं. हा दाखला श्री सिद्धांत विजय ग्रंथांत पहावा.

प्रकरण ४ थें.

## मराठ्यांचीं कुळदैवतें.

देवी, खंडोबा, जोतीबा वगैरे आहेत. ज्या मराठ्यांना गोत्रें माहीत नाहींत, तें त्यांच्या अशिक्षितपणामुळें व धर्मावर विश्वास नसल्यामुळें होय. मराठे हे क्षत्रीय आहेत, कारितां शिकार करून हरणाचे मांस भक्षण करावें असें आहे, परंतु कलीयुगांत धर्माचे भ्रष्टपणानें अलिकडेस बकऱ्या कोंबड्याचे मांस व कांदे ( कंदर्प ) खातात.

कांदे, कोंबडे वगैरे खाणें हें शास्त्र विरूद्ध आहे. मांस खाणें हा शास्त्रार्थ, किंवा धर्म नाहीं. फक्त पूर्वापार चालत आलेल्या वेडगळ चालीं मुळें तो प्रचार जास्त बळावत चालला आहे. ह्या मांस भक्षणाचे योगानें कित्येक ज्ञाती बांधवांनीं सुरादेवींचा ( मद्य किंवा दारू ) अंगिकार केला आहे, व तो जास्त जोरावतांहि चालला आहे. धर्मदृष्ट्या मद्य मांस फारच निषीद्ध आहे. ह्या सुरादेवीनें मोठमोठे श्रीमंत व कुलीन सरदार धुळीस मिळवून, त्यांचे वंशजआज देशोधडीस लाविलें, हें आपण प्रत्यक्ष पाहूनहि अशा

ज्ञिघातक वस्तूंचा त्याग न करितां; सरदार ह्मणवून घेणारे पूर्वी आपणच होतो, आणि हल्लीं दुर्व्यसनानें महारसुद्धां जोहार करित नाहींत. ही मोठी लांच्छनास्पद गोष्ट असून, ह्याबद्दल लाजहि वाटूं नये! हें मोठें आश्चर्य होय! करितां प्रत्येक मराठ्यांनीं आपले जातीस येत असलेली निचता दूरकरण्याकडेस प्रत्यक ज्ञातीबांधव खबरदारी घेतील, अशी आशा आहे. त्याचप्रमाणें कुलदेवता, बकऱ्या कोंबड्यांनीं शांत होतात असें नाहीं. कारण ब्राह्मण जातींत मांस खात नाहींत. त्यांचीहि हीच कुलदैवते असतात. त्यांचे देव नुसत्या नारळानें संतुष्ट होतात. मग आपले देव आपण जर हत्या करण्याचा मार्ग सोडून दिला तर हल्लींपेक्षां जास्त कृपा करितील. ह्या वेडगळ चाली व जुन्या समजूती अशिक्षितपणामूळेंच चाललेल्या आहेत. देव हत्या करा असें ह्मणत नाहीं. त्याजबद्दल (देवाला) रागसुद्धां येत असेल, निदान ज्ञातीबांधवांनीं मांस खाण्याबद्दल प्रतिबंध केला नाहीं. तरी त्यांनीं मद्याचा (दारूचा) अवश्य प्रतिबंध करावा. व त्याजबद्दल जातीचा बहिष्कार ठेवावा. हा नियम ठरविला ह्मणजे [illegible]बद्-

ल्चा छी: थू: दूरहोऊन मनुष्य दुर्व्यसनी होणार नाहीं कित्येक अशिक्षित महार, गोंड, वगैरे अतिनिच जातींनें मुद्धां मद्याचा निषेध केला आहे. मग मराठ्यांनीं क्षत्रीय म्हणवून घेऊन अशा निच कामांत प्रवृत्त असणें हें चांगळे नाहीं. करितां मद्य मांसाचा निषेध करतील तर बरें होईल. तूर्त मद्याचा तरी निषेध करावा.

---

प्रकरण ५ वें.

## लग्न समारंभ.

मराठ्यांना, ब्राह्मण योग्य व यथा शास्त्र कर्म सांगत नाहींत. ब्राह्मण इतर शुद्राप्रमाणें अडाणी मनुष्यांस ज्याप्रमाणें कर्म सांगतात त्याप्रमाणेंच मराठ्यांनांहि सांगतात. व त्याप्रमाणें अडाणी मराठे वागतात. ह्याजकरितां मराठ्यांनीं योग्य विद्वान ब्राम्हणाकडून मौंज, लग्न, गर्भाधान, मरणाचीक्रिया, श्राद्ध वगैरे धर्माप्रमाणें योग्य व यथाशास्त्र करवून घ्यावें. व खर्च कमी करावा. आपण कोण! आपला धर्म काय! ह्याजबद्दल प्रत्येकानें मन:पूर्वक काळजी घ्यावी. किंवा आपले जातभाईस अशीं कर्में शिकवून त्यांचे

कडून यथासांग कर्म करवून घेत जावे. निव्वळ दुसऱ्या-वर अवलंबून राहूं नये. मराठ्यांनीं लग्नें क्षत्रीय धर्मा प्रमाणें लावावीत, असें असून इकडेस लग्नें ब्राह्मणाचें अती शहाण-पणानें कांहीं ठिकांणीं शुद्रा प्रमाणें लावितात तसें करूं नये. दाक्षिण प्रांतातील रीति प्रमाणें ( बोडक्यांनीं ) लावि-ली पाहिजेत, लग्नांत मधुपर्क, विवाह, कन्यादान, सप्तपदी, लाजाहोम, साडे वगैरे अवश्य ब्राह्मणांकडून करविलेंच पा-हीजें बाशींग व कट्यार (शस्त्र) असावी. मराठ्यांत लग्नानं-तर भेटी घेण्यांचा प्रकार बायकांचा आहे. तो प्रकार पड-द्यांची झाल वगैरे बांधून आंत बायकांना कोंडून मिर-वून भेटी घेवावितात. ही चाल वाईट दिसते. ज्या अ-र्थीं मराठ्यांत पडद्याची चाल आहे त्या अर्थीं भेटीची रीत वराकडील वऱ्हाडणींनीं मुलीच्या लग्न मंडपांत जाऊन भेटी द्याव्या व आपले मोळ्यांचे संस्कार करावे. असे केले तरठीक होईल पडद्यांच्या झालीची चाल जेथेअसेल त्यांनीं बंद करावी तसेंच पायधुण्याची चाल फार असूनये वरा कडील सर्वच वऱ्हाडणीचें पाय धुण्यापेक्षां कंकण बांधणाऱ्या मुख्य वऱ्हा डणींचें धुवावें. नाहीं तर हमेशा बायकांत कलहहोत असतो-

तो अशानें बंद पडेल. लहान मुलां मुलींचें लग्न करण्याची चाल दिवसें दिवस वाढत चालली आहे. परंतु ही चाल वाईट आहे. मुलींचें लग्न बारावर्षांचे वर व पंधराचें आंत आणि मुलाचे, अठरा पासून पंचेवीसावे वर्षाचे वय होईपर्यंत (सरासरीचे) वयाचे योग्य प्रमाण पाहून करावें. परंतु अज्ञान मुला मुलींस लग्नाचा अर्थ बिलकूल कळत नसून लग्न काय आहे हे त्यांना त्यावेळेस समजत सुद्धां नाहीं. ह्यानें बहुतेकांचे संसाराचे वाटोळे व अनर्थ ही झालेले आहेत. अलीकडेस (मराठ्यांत) वधूवराचे रंगरूप, वय, व स्वभाव ह्या कडेस कोणी लक्ष देत नसून नुसते विहीण, व्याही, धन दौलत ह्याकडेस विशेष लक्ष देतात व लहान अर्भकांचे सर्व आयुष्याचा नाश करितात. विहीण व्याही धनदौलत ही वधूवराचे जन्मास पुरणारे नसतात व त्या पासून त्यांना कांहींच उपयोग नसतो. एकंदरीत वधूवराच्या स्वभावाचा, वयाचा, शरीर प्रकृतीचा, रंगरूपाचा मेळ व विद्या पाहून (शरीर संबंध) लग्न केलें तर जितकें फायदेशीर होईल तितकें विहीण, व्याही, धन दौलत ह्यानें हो-

णार नाहीं ह्याजबद्दलचा विचार प्रत्येकानें करावा. तसेंच आज काल मुलीचा पैसा आईबाप घेतात व श्रीमंताचें घरीं देण्याकरितां हुंडाही देतात पण ह्यापैशाचे लोभानें कित्येक कुलीन मुलें गरिबीमुळें अविवाहीत आहेत मुलीचे पैसेघेणे (कन्याविक्रय) ह्यासारखे महानपातक दुसरे नाहीं. तर ही पैसे घेण्याची किंवा देण्याची चाल बिलकूल असू नये. मुलीचें लग्न करण्याचें सामर्थ्य नसेल तर मुलीचें लग्न लाऊन घेऊनजा म्हणून वराचे स्वाधीन करावी. व वरानें आपले खर्चानें लग्न लावून घ्यावे. तसेच मराठ्यांत अहेर करण्याची चाल फार आहे. अहेर घ्यावयाचे व पुन्हा परत करावयाचे ही चाल वाईट आहे. फकत ज्याचे घरी प्रसंग असेल त्यांनीं करवून घ्यावे पण परत करूं नयेत. व जावायांच्या किंवा मुलीच्या येथील अहेर केव्हांही घेऊं नयेत. जावायास अनुकूल असल्यास करावेत. इतरांनी सोयऱ्या धायऱ्यांनीं अहेर करावयाचे ते बहुत करून नगदी नाण्यांत करावेंत परन्तु कपड्यांत व्यर्थ पैसे खर्चू नयेत. त्याची यत्ता सवारुपया पासून पांच रुपया पर्यंत असावी, ज्यास्त फाजील खर्च करूं नये. हा नियम गरिबा

पासून श्रीमंता पर्यंत लागू करावा. भाऊबंद किंवा गोत्र पुरुष ह्यांनीं अहेर करूं नयेत. गरीबानें तर अहेर न करणेच चांगले, अहेर न करण्या बद्दल कोणाचि रुसूं नये. येणारे मंडळीनें प्रसंगाप्रमाणें वागून आनंदानें कार्य निभवून न्यावे. रूसणे, मानापमान पाहाणे, दोन्ही पक्षांस त्रास होईल व प्रसंग बिघडेल, असे वर्तन करूं नये, ज्यानां असे करणे असेल त्यांनीं प्रसंगास येऊंच नये, यावेतर स्वतःच्या घरची आळणी भाकर मिठावांचून खावविते त्याप्रमाणे निभवून न्यावे; नाहीतर अक्षत् दिली नाही ह्मणून रूसावयाचे, घोड्या बैलास चारा दाणा नाही. म्हणून रूसावयाचे, अगोदर जेवण्यास बसले, म्हणून फुगावयाचे, कोणी लऊन मुजरा केला नाहीं, म्हणून राग दाखवावयाचा, ह्याप्रमाणे अझूनही मराठ्यांत ही रीत चालूच आहे, पात्रवाढून शिळे झालेतरी जावयाचे नाही. पोटभर घरी, मीठ भाकर जेवून पंक्तीतील अन्नाचा नासोडा होण्या करितां किंवा आपणास नाजूक म्हणावे म्हणून, उगीच पानावरील अन्न तसेच राहील ह्यावेतानें चाखत चाखत जेवावयाचे, व वाढलेलें अन्न खराब होऊं

द्यावयाचें ( टाकावयाचें ) अशानें तोंडावर कोणी बोलत नाहींत. पण मागे निंदा होते, जेवण्यास बसण्याचे पूर्वी मुळींच पात्रें वाढूं नयेत. अशी रीत केली ह्मणजे परब्रह्म जें अन्न तें खराब होणार नाहीं. पंक्तींत बसल्यावर पात्रें वाढावींत अन्न शिळें करूं नये. मुलींचे आईबापांनीं जेवणें ( भोजन ) एकापेक्षां जास्त देऊं नयेत. श्रीमंत असल्यास व अनुकूलते प्रमाणें मोठींचतर दोन जेवणें द्यावींत कारण त्या दिवशीं गडबड असते. लग्नाचे दिवशीं जेवण देण्याची चाल बंद करावी. फाजील तऱ्हेनें खर्च वाढवूं नये. प्रत्येकानें निकट संबंधाशिवाय इतर मंडळीस बोलावून फजिती करून घेऊं नये. प्रत्येकानें आपली व्यवस्था मानापमाना वांचून करून घेण्याचें सामर्थ्य असल्यास विचार करून जावें. पण ज्याचे येथें प्रसंग आहे. त्याची फजिती करूं नये. साखरपुडा वगैरे प्रकार लग्नांतच करावे. अगोदर करून खर्च वाढवूं नयेत. जाणाऱ्या मंडळींनें प्रसंग बिघडवूं नये. व लग्नांत हल्लींप्रमाणें फाजील खर्च करूं नये. जसा खर्च असेल त्याचा उपयोग वधुवरास करून द्यावा. लग्नप्रसंग युक्तीनें व बिनबोभाट बिसवून

न्यावेत. अक्षद लग्नांतील एका मुख्यानें सर्वांकरितां घ्यावी. व ती सर्वांनीं मान्य करीत जावी. अमूक आले नाहींत ह्मणून वेळ मोडूं नये. व जेवणाची वेळ झाल्यावर उशीर मुळींच करूं नये. कोणी राहून गेलें असलें तरी त्यांनीं मागून जेवावें. इतर मंडळी ज्यांचा अपमान होईल, किंवा प्रसंग बिघडेल अशी नेऊं नयेत. ज्यारत गाड्या किंवा वऱ्हाड वगैरे मंडळी नेऊं नयेत. पाहिजेलतर आपले इष्टमित्र सोयरे धायरे ह्यांना प्रसंग निभावल्यावर आपले घरीं बोलावून त्यांची समजूत करून द्यावी. व त्यांचे स्वागत करावें. लग्नांतील मंत्राचा अर्थ वधुवरास समजाऊन द्यावा लग्नानंतर मुलगी आपले घरीं नांदण्यास आली ह्मणजे कित्येक ठिकाणीं घरांतील स्त्रिया × × × × पानदान × × × × करवितात. ह्मणून समजतें ही रीत त्यांनीं बंद करावी. कारण हें लहान जोडप्यास घातक आहे. मोठ्या (शहाण्या) जोडप्यास सांगणें नको. तसेंच सासवांनीं व नणदा वगैरेंनीं सुनांना फार जाच करूं नये. योग्य शिक्षण द्यावें. त्या उद्धटपणानें न वागतील व संसार चालवितील, असें शिक्षण द्यावें. जांच केल्यानें कोंवळ्या पोरींची

शरीरप्रकृति सुदृढ होत नाहीं. व आपल्या मुलांवरही प्रमाणेंच सुनांवरहि प्रेम करावें. वध्वानें तेल वांग्यावर काढूं नये.

त्याच प्रमाणें लहानपणीं लग्न केलें असतां अनेक-डील दिवस विपरीत असल्यामुळें पुष्कळशा मुली गर्भाधानाचे ( ऋतुप्राप्तीचे ) पूर्वीच विधवा झालेल्या आहेत. ह्याजकरितां मुलीचें लग्न अज्ञानपणीं मुळींच करूं नये. तसेंच वृद्धपणीहि कित्येक पुरूष लग्नें करीतात. त्यामुळेंहि कित्येक तरुण मुली विधवा आहेत. करितां पुरूषांनीं पंचेचाळीस वर्षांचे वयाचे पुढें लग्न करूं नये. किंवा अशा वरास आईबापांनीं पैशाचे लोभाकरितां मुली देऊं नये * नाहींतर अझून पर्यंत सुद्धां कांहीं नसो, पण मुलीस खाण्यापिण्या करितां असो. मग ती विधवा होवो, किंवा कितीहि

* टीप- वृद्धपतीची फजिती हें नाटक वाचावें, 'बाई आली पणांत, बुवा बसले कोनांत' म्हातारा नवरा तरुण मुलीस कसा आवडेल! हा म्हातारा सर्व सुख भागलेला असतो. व ह्या मुलीची इच्छा असते, त्याप्रमाणें कांहींच घडत नाहीं. म्हणून म्हाताऱ्याच्या तरुण स्त्रियांनीं चांगलें राहणें कठीण, ह्याकरितां वृद्धांनीं लग्नें करूं नयेंत हेंच चांगलें.

सवती असोत. किंवा तो वृद्ध असो, ह्याचा विचार मराठे लोकां करीत नाहींत, मराठ्यांत एकापेक्षां जास्त स्त्रिया करण्याची रीत पडलेली आहे, ती फार वाईट आहे. ह्याजकरितां अनेक स्त्रिया करून आपले संसाराचें व सुखाचें वाटोळें करून घेऊं नये, व सवतीवर मुली कोणीच देऊं नयेत. अतीश्रीमंतानें संतती करितां दुसरें लग्न पहिल्या स्त्रियेस संतती होण्याची आशा नसल्यास, व तिचें वय पंचवीस वर्षांचेवर होईल तेव्हां तिच्या समतीनें व पंचाचे संमतीनें सोयपाहून करावें. पण दोघींना सारखे वागवावें. त्या एक दिलानें वागतील अशी वर्तणूक ठेवावी. परंतु पंक्तीभेद करूं नये. श्रीमंतानेंसुद्धां संततीचे कारणाशिवाय दोन स्त्रियांपेक्षां जास्त स्त्रिया मुळींच करूं नयेत.

मराठ्यांत पुनर्विवाह नाहीं. त्यामुळें बहुतेक अज्ञान व तरुण मुलींचें जन्माचें वाटोळें झालें आहे. आणि कित्येकतर दुराचरणा करितां बाहेर निघून गेल्या आहेत. कित्येक गुप्तपातकें करून हत्याहि ( गर्भाची ) करीत असतील. ह्याजबद्दल सूज्ञ व विद्वान जातीबांधव एखादा नियम पाळतील व गरीब अबलांची कींव घेतील. तर होत

असलेलें दुराचरण व पाप हें बंद होऊन स्त्रियांचे सुधारणे-
ची एक चांगली रूढी अमलांत आली असें होईल.

ब्राह्मण मराठ्यांपेक्षां श्रेष्ठ जात असून कित्येकांनीं जर अशी सुधारणा केली आहे, तर अशी सुधारणा करण्यास आपणास काय हरकत आहे व दिवसाचे ओघानें-काळास अनुसरून प्रत्येकानें शास्त्रांचें नियमांची सुधारणा करणें हें पाप नसून योग्य कर्माचें नियम पाळणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. प्रथम ही चाल आनिष्ट वाटेल, व तिरस्कारणीय होईल. परंतु कांहीं दिवसांनीं ती ज्ञातीबांधवांचे विशेष फायद्याची होईल. परंतु हा नियम अमलांत आणण्यास ज्ञातीबांधवास तिटकारा येईल. पुरूष व स्त्रिया हे सर्व परमेश्वराचे एकच जीव आहेत. त्या ठिकाणीं पुरुषांनीं आपले सौख्याकरितां वाटेल तसे नियम करणें व स्त्रियाकरितां प्रतिबंध ठेवणें, त्यांची कांहींच व्यवस्था न करणें हे सूज्ञ व विचारशील पुरुषांस किती पाप आहे. हा अन्याय आपणच करीत आहों, हें खात्रीनें ह्मणावें लागतें.*

* टीप–तुमची स्त्री तुमच्या तरूणपणीं किंवा वृद्धपणीं जर मरण पावलीं तर मग तुह्मीं तसेंच कां रहात नाहीं. तुह्मीं तसें रहात असाल

जर तुम्ही शास्त्राप्रमाणें चालत आहां, तर मग कोंबडी, कांदे वगैरे अभक्षणीय पदार्थ कां सेवन करतां, नवीन तऱ्हा कां स्वीकारतां, आपले धर्माप्रमाणें वागत असाल तर मग कांहीं ह्मणणें नाहीं. आपण पाहिजेल तसें वर्ताल, व स्त्रिया करितांच शास्त्र पुढें ढकलाल तर निरुपाय आहे. तुह्मांहि एकपत्नि, सत्यवचनी, स्वधर्मी रहा. मग कोणीच तुह्मांस आग्रह करीत नाहीं. करितां मराठे संस्थानिक, महाराजे, व ज्ञातीबांधव ह्या गोष्टीकडेस लक्ष पुरवितील, व स्त्रीपुरुषास सारखा न्याय देतील, अशी आशा आहे निदान ज्यांना संसार मुळींच माहीत नाहीं. अशा तरुण व अज्ञान मुलीकरितां पंचानें नियम करावें. अज्ञान मुलींचें लग्न तरी ऋतुप्राप्त झाल्यावाचून करूं नये, असें ठरवावें. निदान बालविधवे करितां तरी हें नियम करावें. व पंचाचे मता शिवाय अशा कामाची संमती असूं नये. करितां प्रत्येक जातीबांधवानें अनुभवानें व योग्य विचार करून हें म्हणणें विरूद्ध असल्यास दोष द्यावा असें करण्याबद्दल जबरदस्तीहि कोणी करीत नाहीं. पण ' आंधारापेक्षां

---

तर स्त्रियांसहि तशाच ठेवा.

डजेड बरा ' ' मळमळीत सौभाग्यापेक्षां ढळढळीत वैधव्य बरें ' ह्मणून सुधारणे करितां ही सूचना केली आहे.

विवाहास वधुवरांचे संमती योग्य वर व योग्य स्त्री, आहे कीं नाहीं, हें गुप्तपणें तरी शोधून ध्यावें. ह्मणजे तें जोडपें सुखानें जन्मपर्यंत नांदेल व कलहाचा किंवा दुराचरणाचा अशानें मार्ग बंद होईल. व अनेक स्त्रिया करण्याची चाल बंद पडेल. स्त्रियांना विशेष विद्येचें शिक्षण न देतां निदान त्यांना संसार काय आहे. आपण कोण? आपलें कर्तव्य काय? घरचीं माणसें कोण? पाप व पुण्य कशांत आहे? आपला आय व खर्च काय; कोणाशीं कशा मर्यादेनें वागावयाचें; इतकें समजण्या पुरतें तरी विद्येचें शिक्षण प्रत्येक स्त्रियेस असून तें मर्यादित असावें व त्यांनीं वडिलांचे आज्ञेंत वागून संसार दक्ष असावें.

---

प्रकरण ६ वें.

## मराठ्यांतील पडदा किंवा स्त्रियांचा गोषा.

ही चाल पुरातन आहे, असें नाहीं. अलीकडेस मुसलमानांनीं राज्य केलें तेव्हां ही रीत सुरू झाली असावी.

असें वाटतें कारण बंडखोर, मुसलमान राजे सुंदर स्त्रियांस बलात्कारानें घेऊन जात, पुरुषांस लढाईकरितां हमेशा घर सोडून बाहेर जावें लागत असे त्यामुळें मराठ्यांना हा पडद्याचा नियम करावा लागला. स्त्रिया जर त्यांच्या ( बंडखोराच्या ) दृष्टीस पडल्या नाहींत, तर ते कोठून नेतील, परंतु तीवेळ तशीच होती व तो कालहि तसाच होता, त्यावेळेस मराठ्यांना स्त्रियांस पडद्यांत ठेवण्यापुरती ऐपत होती. तेव्हां असे उपवासी मरण्याचे विपरीत दिवस नव्हते. आतां सर्व कुटुंब उद्योग करितें तरी दुसऱ्या दिवशीं पुन्हां उद्या कसें होईल? काय होईल ही फिकीर राहतेच. आतां ती सरदारी, मानीपणा किंवा ऐट गेली. आतां स्त्रियांना विशेष पडद्यांत ठेऊन अर्थ नाहीं, पडदा अजीबात बंद करूं नये पण तो मर्यादयुक्त असावा. तो अति नसावा.

आजकाल मराठे इतका भयंकर पडदा ठेवतात कीं; घरांतल्या वडील किंवा लहान पुरुषांस स्त्रिया पाणी सुद्धां देत नाहींत. तर सासरे, दीर, भासरे वगैरेच्या दृष्टीस पडतील कोठून? हे सृष्टीचे विरूद्ध आहे. पडदा वरां-

टीळ पुरुषाकरितां ठेवणें ह्मणजे एक प्रकारची कैदच आहे. पुरुषांनीं पडद्यांतील स्त्रियासमोर गुलामां प्रमाणें कामें करणें व स्त्रियांना आळशी बनविणें ह्यासारखें आहे. जर एका घरीं एकच स्त्री व एकच पुरुष आहे. व त्याचे घरीं जर त्याचा मित्र किंवा नातलग आला, व घरीं दुसरें कोणी नसलें किंवा गरिबीची स्थिति असली, तर तो पुरुष स्वतः घरांतील बायको प्रमाणें विहिरींतून पाणी काढून डोक्यावर घेऊन येईल तेव्हां ती घरांतील कामें किंवा स्वयंपाक वगैरे करील व तो मित्र किंवा नातलग जे त्याकरितां एकटाच बसेल व हा त्याला वाढेल, ह्मणजे एकंदर पडदा करून सुखापेक्षां दुःखच करून घेणें आहे. पडदा अती नसावा. इतरांचे दृष्टीस स्त्रियांनीं पडूं नये. स्त्रियांनीं मर्यादेनें बुरखा किंवा पदर पुढें करून घरांतील मंडळी समोर वागावें. हीः हीः हाः हाः करूं नये विशेष बोलूं नये. थट्टा करूं नये. उद्धट पणानें वागूं नये. पडदा मुळींच बंद करूं नये. परंतु आप्त स्वकीया पुढें पदर घेऊन वर्तावें. भलत्याशीं बोलूं नये. उघड्या माथ्यानीं किंवा उद्धटपणांनीं सर्व तोंड उघडें करून राहूं नये. इकडे घरांत काहीं नाहीं. व

पडदा करून उपवासी मरा, ह्यासारखा पडदा कोणत्या कामाचा? घरांतील दीराने पाण्याकरितां ओरडावें पण भावजयीनें सासूचे व नवऱ्याचे धाकाकरितां दीरालासुद्धां पुढें पदर घेऊन पाणी देऊं नये असा पडदा बंद करावा.

तसेंच देवपुजा किंवा सत्यनारायणची पुजा जेव्हां नवरा बायको करितात. तेव्हांतर बायकोनें सोवळ्याचें पांघरून नेसावयचें व बरून घाणेरडी अशुद्ध बुत घ्यावयाची ही बुत पांघरण्यापेक्षां नेसलेले वस्त्राचा पदर व बुरखा पुढेंकरून मर्यादेनें पुजेस बसावें परंतु ओवळ्याची पांघुरणें सोंवळ्याचें कामांत वापरू नयेत. पडद्यांपेक्षां मर्यादेचें वर्तन ठेवून सुनितीनें वागण्यांचे स्त्रियांस शिक्षण द्यावें. उद्धटपणाला पडदा असावा. व त्याची मर्यादा असणें हें चांगलें. नाहींतर वडीला समोर पडदा व मागे × × × × आतांतर ह्या दयाळू इंग्रजसरकारचे कृपेनें व कायद्याचे बंधनानें जुलूम करण्याचें व पळवून नेण्याचें यवनीबंड नाहींसें झालें आहे. करितां सर्वांनीं पडद्याची सुधारणा करावी. कारण कीं; गरीबांच्या स्त्रिया शेतांत जातात. व घरीं आल्यावर पडदा करतात. मग त्या पडद्यांत अर्थ काय?

प्रकरण ७ वें.

# किरकोळ चाली.

## [१] कपड्यासुद्धां भोजन.

तसेंच मराठे हे क्षत्रीय असून, हमेशा मोठ्या प्रसंगांत, पंक्तींत किंवा घरींहि अंगावरील पांघुरणासुद्धां भोजन करीतात. पूर्वी लढाईमुळें कोणीकडून शत्रु येईल? व वेळ जाईल. ह्यामुळें कपडे काढीत नसतील. तर तीवेळ तशीच होती. कारण ह्मण आहे कीं; ' विपत्त काले मर्यादा नास्ति ' तसें करूं नये.

## (२) स्वज्ञातींत एकपात्री भोजन.

स्वज्ञातींत एकपात्री भोजन करण्याची चाल वाईट आहे, कारण वडीलांना सुद्धां लहानाचें उच्चीष्ट खाणें भाग पडतें. व एकपात्री भोजन करण्यानें लहानावर पाप पडतें. करितां एकमेकांचें उच्चीष्ट एकपात्री भोजन करून खाऊं नये. करितां एकत्र भोजन करण्याची चाल बंद करावी.

## [३] देवपुजा.

मराठ्यांनीं देवावर श्रद्धा ठेवावी. मराठ्यांत पुरुषांना देवपुजेचा तिटकारा विशेष दिसतो. देवपुजा व व्रतें बहुत करून स्त्रियाच करीतात, असें दिसतें. पण स्त्रियां ( शुद्र ) ना देवपुजेचा अधिकार नाहीं. पुरुषांना आतां वेळ व फुरसत पुजाकरण्या करितां नसून, पुरुष देवपुजा करीत नाहींत, ही दुःखाची गोष्ट आहे. देवावर विश्वास प्रत्येक पुरुषानें ठेवावा. व पुजाअर्चा करीत जावी. ही विनंती आहे.

## (४) अंगावरील दागिनें.

अस्सल ( खरे ) मराठ्यांनीं आंगावर चांदीचे दागीने घालूं नयेत. फक्त पायांत स्त्रियांनीं चांदीचे तोडे, जोडवे वगैरे घालावें. कमरेचा करदोडा किंवा हातांत आंगठ्यासुद्धां चांदीच्या घालूं नयेत. अनुकूल असल्यास आंगावर सोन्याचे दागीने घालावे. अलीकडेस ह्या नियमांकडे कोणीच लक्ष पुरवीत नाहींत, तसें करूं नये. चांदीचे दागीने सर्वी मराठ्यानीं घालतेत. व सर्वांनीं आ-

नवें ( यज्ञोपवीत ) घालूं नये. व त्यांना आनंद ब्राह्मणांनीं देऊं नये. ख्रीनें ( विदुरानें ) आपण अशुद्ध आहों त्या-बद्दल सांगू नये. व तसें जरी ते करीत असतील तरी अ-खरानें गाढवाचें घोडें कधींहि व्हावयाचें नाहीं.

---

## (५) अन्यजातीशीं अन्नव्यवहार.

मराठे हे बहुत करून बहुतेक जातीच्या हातचें भो-जन करीतात, असें वाटतें. परंतु ह्याजबद्दल मराठ्यांची निंदा होते. आपल्यापेक्षां नीच जातीचे हातचें ( विदूर म-राठ्यांचें ) भोजन करूं नये. कारण, एखाद्या वेश्येचे किंवा महाराचे घरीं एखादी ब्राह्मणीन जर बटकीण ( भागशीण ) असली, तरी ती वेश्या किंवा तो महार त्या बटकी ब्राह्म-णीनचे हातचें अन्न खाणार नाहीं. पण मराठे मंडळास अशाबद्दल कांहींच विशाद वाटत नाहीं. सुखाकरितां व हांजी हांजी करणारे गुलामाचे खुशामतीस भुलून नीच ( भागवर्गीचे ) जातीचे हातचें अन्न खातात. हें कुली-नास योग्य नसून शास्त्रदृष्ट्या बहिष्कारयुक्त आहे, असें प्र-त्येकानें समजावें. आचारांत जातभाई शिवाय इतर जाती-

चे हातचें अन्न खाण्याचा प्रतिबंध करावा.

## (६) मराठ्यांचे नांवापुढें राव किंवा-साहेब हें उपपद लावतात.

मराठ्यांचे नांवापुढे राव किंवा साहेब हे उपपद ला-वण्याची चाल पडलेली आहे. कारण हे क्षत्रिय आहेत. व क्षत्रीयांना राव ह्मणतात. मराठे हे सरदार, मानकरी वगैरे मोठमोठ्या योग्यतेस ( मानास ) चढले असल्यामुळे, ह्यांना हे कायमचे उपपद लावण्यांत येत आहे. व ह्या उपपदावरून वाचकांचे ध्यानांत येईल. अलीकडेस कित्येकाना खावयास मिळत नाहीं. व दास्यत्वापेक्षां नीच कामें करावीं लागतात. असे उपपद आपणास राहिलें पाहिजे. अशी जर इच्छा असेल, तर विद्येनें, शहाणपणानें आणि उद्योगानें योग्यतेस पात्र व्हा? ह्मणजे अशा उपपदानें सर्व आळवितील. पण घरांतील माणसाकडून ह्मणवून घेऊन उपहासास पात्र होऊं नका. अविद्येनें हीनपणा जो आला आहे, तो दूर करा? विद्वान व कुशल होऊन राजनिष्ठ व्हा?

## (७) सात घराणे हे शाण्णवकुळीं आहेत.

शाण्णवकुळी मराठे व सात घराणे ( पंचकुळीं ) हे एकच आहेत. ह्यांच्यांत मुळींच फरक नाहीं. सात घराणे मराठे, हे शाण्णवकुळींतीलच आहेत. हा भेद नागपुरासच दृष्टीस पडतो. परंतु महाराष्ट्र व दक्षिण प्रांतांत सर्वत्र एकच आहेत. कारण देशांत सातारा, पुणें, ग्वाल्हेर, बडोदें, कोल्हापूर वगैरे कडील त्यांचे व ह्यांचे सोयरे व शरीरसंबंध एकच आहेत. ह्याजवरून वाटतें कीं; ही सात घराण्याची रीत मध्यंतरी पडली, पण ती शेवटास गेलेली नाहीं. व त्या नियमास धरून सात घराणेंवाले चालतहि नाहींत. असें दिसतें. तसेंच असतें तर अनेक कुळांचे शरीरसंबंध त्यांनीं केलें नसतें, हे सर्व शाण्णवकुळीच आहेत. तें व हें एकच आहेत. सात घराणेहि निराळी जात नाहीं राजकीय श्रीमंतीचे जोरावर एक नियम सोयऱ्यांचा जास्त घोटाळा न व्हावा. ह्मणून केला होता. तो नियम केला तरी अखेर सात घराणेवाल्यांना शाण्णवकुळींतीलच संबंध करावा लागला. तें त्याचे करणें शेवटास गेलें नाहीं. करितां सर्वत्र

मराठे शाण्णवकुळींतलिच आहेत. ही सात घराण्याची कल्पना मनांत ठेऊं नये. अस्सल मराठे व देशमुख पदवीचे मराठे एकच आहेत.

---

## (८) स्त्रीयांनीं पाट करण्यास हरकत नाहीं.

स्त्रीयांनीं पाट करण्यास कांहींच हरकत नाहीं. पण ते पाट करीत नाहींत. आपणांत अवश्य पाट सुरू करावा. त्यांना पाट करण्यास कोणतीच हरकत नाहीं. ब्राह्मणांचे विदूर पाट करितात मग ह्यांना करण्यास काय हरकत आहे.

## (९) मराठ्यांची सभा.

मराठ्यांची एक सभा प्रत्येकवर्षी भरवी. व ती कोठेतरी दोन दिवस भरावी. व त्यांत सुधारणा वगैरे करणे असतील त्या कराव्यात, व नियम ठरवावे. अशानें जातीची एकी राहून धर्मावरून श्रद्धा बसेल, व अज्ञान मराठे मंडळ सुधरेल, ह्याकडेस मोठमोठ्या मंडळींनें लक्ष पुरवावें. सभेस येणाऱ्या प्रत्येक गृहस्थांनीं आपापली व्यवस्था करून घ्यावी. त्याठिकाणीं सभा भरविणा करण्यास मंडळीवर अ-

लंबून राहूं नये.

---

प्रकरण ८ वें.

## दासीपुत्रास दाय भाग नाहीं.

दासीपुत्रास दाय भाग नाहीं. (मराठ्यांचे विदूरास ) ह्मणजे हिस्सा नाहीं, कारण.मराठे हे क्षत्रीय आहेत. दासीपुत्रास दाय भाग फक्त शुद्र वर्गास लागू आहेत. असें शास्त्रांत आहे. मराठ्यांचे दासीपुत्रास दाय भाग मिळण्याचा हक्क नाहीं. ही रीत चांगली आहे, व ह्याचा उपयोग प्रत्येक मराठ्यांनीं करावा. मराठे हे राजे व सरदार असल्यामुळें, ह्यांच्या येथें अनेक दासी ( भाणशीणी ) वगैरे राहात असतात. ह्या कामधंदा करण्याकरितां बहुतकरून असतात. ह्यांना खास यजमानाची संतती होते असे नाहीं. ह्मणूनच ही रीत सुरू आहे, व नवीन रीतीस ही गोष्ट चांगली आहे असें वाटतें.

कारण जर दाय भाग नाहीं, तर पुढेंहि प्रत्येक दुर्वर्तनी स्त्रियेनें दुराचरणाकरितां मराठ्यांचे घरीं राहूं नये.

दुराचरणी स्त्रिया निपजूं नयेत. त्यांना झालेल्या संततीचे उदरपोषणाची पंचाईत पडेल, अशा कडूभोपळ्यांचा कांहींच उपयोग नाहीं, हे पूर्णपणें दुर्वर्तनी स्त्रीपुरुषांनीं ध्यानांत ठेवावें. पुरुषांनीं स्त्रियेस किंवा भाणषीणीस कोणताहि करार करून दिला, तरी तो रद्द समजावा. प्रत्येक ज्ञातीबांधवानें यथाशास्त्र मदत करून आपले जातभाईस दुर्व्यसनांत घालूं नये. व ह्या चांगल्या रुढीची पायमल्ली करूं नये. जर हा नियम लागू नसता, तर कित्येक गुलाम ( विदूर ) श्रीमंत होते, व कित्येकांनीं तर राज्याचें जाहागिरींचे मोठमोठ्या इस्टेटींचे, शेतीवाडीचे हिस्से घेतले असते, व मोठमोठ्या इस्टेटी बुडाल्या असत्या. ह्याजवरून वडीलांचे ह्या जुन्या रुढीबद्दल थोरपुरुषांचे आभार प्रत्येकानें मानावे.

---

प्रकरण ९ वें.

## मराठे व कुणबी ह्यांच्यातील रुढीचे अंतर.

नागपूर व वऱ्हाड प्रांतांत मराठ्यांपेक्षां कुणबी व

कुणबी देशमुख, ही जात पुष्कळ आहे. परंतु ते मराठे न-व्हत. इकडे मराठ्यांना देशमुख ह्मणत नाहींत, कारण. पुष्कळ दिवसांपासून देशांतून आल्यापासून, व इकडे त्याना देशमुखी वगैरे नसल्यामुळें, व तिकडील त्यांचें हक्क व व-तनें नष्ट झाल्यामुळें त्यांना देशमुख ह्मणण्याची चाल बंद पडलेली आहे तरी इकडे असलेले खासे मराठे हे जरी हल्लीं देशमुख नाहींत. तरी ते कमी दर्जाचे आहेत, असें नाहीं. कारण. त्यांचे शरीरसंबंध देशांत आहेत, व ते ति-कडील ( देशांतील ) देशमुखांचे नातलगहि आहेत.

देशमुख ही सरकारनें दिलेली देणगी आहे. देशमु-ख ही जात आहे असे समजूं नये. व अस्सल असलेले म-राठे देशमुखी नसल्यामुळें कमी आहेत, असे समजूं नये. कुणबी हे पाट करितात. मराठे हे पाट करीत नाहींत. जे कुणबी पाट वगैरे करीत नाहींत. ते देशमुखाची सोयरीक करितात, व जानवें घालतात. जे कुणबी देशमुख पाट करितात, ते कुणब्यात गणले जातात. कुणब्याचे लग्नांत बायका जात नाहींत. कुणबी देशमुख हे कुणबीच आहेत. असे कुणबी देशमुख कबूल करीत नाहींत. कुणबी व दे-

शमुख ह्यांचा अन्नव्यवहार, शरीरसंबंध व लग्नांवगैरेची रीत एकच आहे. त्यांच्या व मराठ्यांच्या चालींत फरक पुष्कळ आहे. कुणब्यांत पडदा नाहीं, व ते जानवें घालीत नाहींत. त्यांच्या बायका आंगावर चांदीचे दागिनें घालतात. फक्त कुणब्याशीं व मराठ्याशीं अन्नव्यवहार कोठें कोठें आहे. कित्येक कुणबी मराठ्याशीं अन्नव्यवहार करीत नाहींत. मराठ्यांत लग्नांत बाशिंग बांधतात, व कट्यार वगैरे शस्त्र बाळगतात. मराठ्याप्रमाणें कुणबी लग्नाचे अगोदर देवप्रतिष्ठा करीत नाहींत. अलीकडेस कांहीं कुणबी देशमुख मराठ्यांप्रमाणें करीत असतील तर सांगवत नाहीं. पण लग्नांत देशमुखसुद्धां बायका नेत नाहींत तर मग देवप्रतिष्ठा कशी करीत असतील याची कल्पना वाचकांनींच करावी. मराठ्यांत अस्सल व खर्ची ह्यांचा शरीरसंबंध मुळींच होऊं शकत नाहीं. खर्ची व अस्सल एक आहेत असें समजूं नये. अन्नव्यवहार कांहीं करितात. ह्मणून ते एक होऊं शकत नाहीं. अन्नव्यवहार करणें न करणें प्रत्येकाचे स्वाधीन आहे. जर केला नाहीं तर जबरीहि नाहीं. माझे मतें निचाचे हातचें अन्नखाण्याबद्दल प्रतिबंध करावा. खर्ची पाट करीत

नाहींत, ह्मणून अस्सल होऊं शकत नाहीं. कांहीं ब्राह्मण, मुसलमान वगैरेसुद्धां देशमुख आहेत, ह्मणून देशमुख ही जात नाहीं, असें समजावें.

---

प्रकरण १० वें.

# सारांश आणि पुस्तक कर्त्याची विनंती.

मराठ्यांनीं स्त्रीपुरुष वर्गाकरितां चांगलें वळण लागेल, व सुधारणा होईल असे नियम करावे. सभा नेमाव्या. व लिहिलेली 'रुढी' चुकीची आहे असें कित्येक ह्मणतील, परंतु अनुभवानें दिवसास अनुसरून लिहिली आहे. ह्या लिहिण्यांत कित्येक वेळा भुलून पुन्हा पुन्हा तोचतो मजकूर आलेला आहे ह्याजबद्दल वाचक व जातीबांधव क्षमा करतील, चालूकाळास ज्या सुधारणा योग्य आहेत. त्या प्रचारांत आणण्याकरितां प्रत्येक जातीबांधव कांहीं मनांत कल्पना न आणितां आपापले विचार प्रदर्शित करीतील, प्रत्येक ज्ञातीबांधव आपापले सोयऱ्यास, इष्टमित्रास; आप्तवर्गास, प्रत्येक सुशिक्षीत मनुष्य उपदेश करून कांहींतरी

जातींची सुधारणा करतील, व धर्मप्रमाणें राजनिष्ठेस पात्र होऊन देशसेवेचे लोकोपयोगी व सार्वजनीक कामें करतील अशी आशा आहे. लग्न, गर्भाधान, बारशें, मरण* वगैरेचा अवाढव्यखर्च व जुने दिवाळें काढणारे रिवाज दुरस्तकरून यथाशक्ति बेताबातनें लोक काय ह्मणतील हें मनांत न आणतां, नियमानुसार थोडक्याखर्चात करावें. 'दिवस पाहून सावधान' ह्याप्रमाणें ऐपत पाहून खर्च करावा. लोकांचे शद्बाकडे लक्ष देऊन भिकेचा मार्ग स्वीकारूं नये. व आपण विपत्तींत पडूं नये. आपल्यावरून जग ओळखावें. प्रत्येक स्त्रीपुरुषांचे सुखदुःख जाणून त्यांच्या सोयी कराव्यात. विद्येची व रुढीची सुधारणा शक्य तेथपर्यंत प्रत्येकानें करून पुढें यावें. वर लिहीलेला लेख फाजील आहे असे कित्येकास वाटेल, व असे लेख प्रसिद्धहि कदाचित् झाले असतील, परंतु कांहींगोष्टी अनुभवीकहि ठरतील.

---

* टीप– मरणाचे घरीं पुष्कळ मंडळीनें जाऊ नये जवळच्या नातलगानें अशौचांत जावें, पण भोजन करूं नये, व तेराव्या किंवा चवदाव्या दिवशीं ज्यांना पितर वगैरेचे निमत्रण येईल, त्यांनींच जावें. फुकट खर्च वाढवूं नये, व त्रास होईल असे करू नये.

' लोकां सांगे ब्रह्मज्ञान व आपण कोरडे पाषाण ' असा जरी लेख असला तरी मला ठेंच लागली आहे. व त्याचें दुःख मी अनुभविलें आहे. पण तुम्हींतरी सावध व्हा! असें माझें म्हणणें आहे. लांडग्या कोल्ह्याचे गोष्टींप्रमाणें तुम्हीं फसावें, अशी माझी इच्छा नाहीं. स्पष्टपणें पुस्तकरूपानें ज्ञातीबांधवांचें कल्याण व्हावें, व त्यांनीतरी सुधारणा करून घेऊन स्तुतीस पात्र व्हावें. माझे लिहीलेल्या लेखांत जें कांहीं योग्य असेल, त्याची सुधारणा करावी. मजसारखे तुम्हीतरी होऊं नका; व खऱ्याधर्मानें वागा, असें माझें मत आहे.

हा लेख रुढीविरुध कदाचित् असेल, अवश्य तवढी योग्य सुधारणा प्रत्येकानें करावी. प्रथम सुधारणा करणें कठीण वाटेल, पण कांही दिवसांनी तीचसोपी होईल. एकघर सुधारलें ह्मणजे तो मोहल्ला सुधारतो व तो मोहल्ला सुधारला ह्मणजे तो गांव सुधारतो, व दोनचार गांवें सुधारलीं ह्मणजे इलाखासुद्धां सुधरून जाईल असें वाटतें. करितां प्रत्यकानें मागसलेल्या मराठे जातीची सुधारणा करून तिला उर्जितदशेंत आणावें. हें प्रत्यकाचे कर्तव्य आहे. मराठे संस्थानिक, महाराज, व श्रीमंत ह्यानीं आपल्या ज्ञा-

तीबांधवास सुधारून त्यांचीं दारिद्र अवस्था आश्रय देऊन दूर करावी. सर्व ज्ञातीबांधवांनीं एकीनें सुधारणेचें अनुकरण करावें.

मुलीचा पैसा घेण्यादेण्याची चाल बंद करावी. अशामुळें गरिब कुलीन कुळें पैशाचे लोभानें हीनकुळाशीं संबंध करूं लागली आहेत. त्यामुळें जातींत घोंटाळा होऊन कित्येक गरीब कुलीनकुळें हिन्त्वास आली आहेत. आणि हिनकुळें आपणास ' चांगली ह्मणू लागली आहेत ' ह्याजकरितां पैशाचे लोभास भुलून हिन्त्वास पात्र होऊं नका; पैशाची व हुंड्याची चाल बंद करा.

तसेंच दयाळू इंग्रजसरकारचें सर्वत्र प्रजेवर व आह्मा मराठ्यांवर पूर्ण प्रेम आहे. ह्याजकरितां सुशिक्षित होऊन राजानिष्ठेनें देशबांधवाचें कल्याण कराल तरच तुह्मीं कुलीन आहा अशी ख्याती होईल. मराठ्यांचीं आडनांवें पूर्वीं जी होतीं त्यांत जो फरक पडलेला आहे, तो गांवावरून किंवा इतर कांहीं कारणानें पडला असावा असें वाटतें.

सूचना:— पान २–३ मध्यें 'श्री सिद्धांतविजय' श्रीशाहूछत्रपती महाराज कोल्हापूर ह्यांनीं छापीला ह्मणू-

न आहे, तर तसे नसून ' श्री सिद्धांतविजय ' सातारा येथें श्री प्रतापसिंग महाराजाचें कारकिर्दींत कैलासवासी विठ्ठल सखाराम उर्फ आबा पारनिस ह्यांनीं तयार केला व तो ग्रंथ रा० महादेव गणेश डोंगरे शास्त्रविषयाचे अध्यापक ह्यांनीं कोल्हापुरास छापवून श्री महाराज शाहूछत्रपती सरकार करवीर ह्यांस अर्पण केला असें समजावें. प्रत्येक मराठ्यानें सिद्धांतविजया प्रमाणें धर्माचे आचरण ठेवावे.

हा लेख मी विशेष रुढींत नसता लिहीला आहे, पण कांहीं दृष्टीस पडलेली रुढि लिहीली असावी अशी माझी खात्री आहे. करिता शुद्धाशुद्ध व राग येण्याजोग्या स्पष्टपणे जाहीर केलेल्या गुप्तगोष्टींबद्दल व तोचतो मजकूर चुकून लिहिल्याबद्दल सर्वत्र ज्ञातिबांधव क्षमा करतील अशी आशा आहे.

दयाळू इंग्रजसरकारनें विद्यालये, व उद्योग शिक्षणाच्या शाळा घातल्या आहेत. दिवसेंदिवस सुधारणा होत आहे. त्यामुळेंच आपणास सुधारणेचे विचार सूचत आहे. ह्याजबद्दल आपल्या राज्यकर्त्यांचें आपणावर महत्‌उपकार आहेत असें समजावे. मी विशेष लेखक किंवा विद्वान

नाहीं. हा पहिलाच प्रसंग आहे, करितां सर्वांनीं हंसक्षीर न्याय करावा.

आपला नम्र जातीबांधव.

एन्. टी. खळतकार.

दिग्रस.

समाप्त

## हे पुस्तक मिळण्याचा पत्ता

रा॰ विठ्ठलराव नरसींगराव खळतकार. देशमुख.

रा॰ शंकरराव बाळा साहेब खळतकार. देशमुख किंवा

रा॰ ग्रंथकर्त्यां कडे विकत मिळतील.

मुकाम–पोष्ट दिग्रस. त॰ काटोल.

नागपुर.

---

## खळतकाराचे संक्षिप्त चरित्र.

कि॰ ॖ६ आणे-

दोन्ही पुस्तके एकदम घेणारास ट॰ ख॰ माफ

यशवंत गोपाळ हेडमास्तर.

दिग्रस

नुसत्या खोबरेल तेलाचा.

स्वदेशी.

# पवित्र साबण

आमचे कडे साबू स्वस्त दरानें विकत मिळेल, गुणा बद्दल दाखले मिळाले आहेत. [ स्माल ]

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| नं. | १ | बड्या | ३ | कि. | ६ | आ. |
| ,, | २ | ,, | ,, | ,, | ४॥ | ,, |
| ,, | ३ | ,, | ,, | ,, | ३ | ,, |
| ,, | ४ | ,, | ,, | ,, | २। | ,, |

मोहदीवाल ऍण्ड ब्रदर्स

नरखेड. नागपूर.